# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४

E-Mail :gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/ ५२५८

दिनांक १८/०६/२०२१

## (परीपत्रक)

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– महाविद्यालयांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा, २०१३ च्या जनजागृतीबाबत

संदर्भ :– १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे दिनांक २४/०५/२०२१ चे पत्र
२. ॲड. यशोमती ठाकुर, मंत्री महिला व बालविकास यांचे दिनांक १३/०५/२०२१चे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयांन्वये आपणांस सुचित करण्यात येते कि, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे पत्रानुसार कामाच्या ठिकाणी महिलांना संरक्षण मिळावे, महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणे यासाठी ''कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ'' (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा, २०१३ हा कायदा तयार करण्यात आला आहे.

या कायद्याची जनजागृती होण्याच्या दृष्टिने महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु होत असतानाच, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या माहीती पुस्तिकेत ''कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ'' (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा, २०१३ च्या कायद्याचे स्वरुप, महाविद्यालयांत असलेली तक्रार निवारण समिती आदिबाबत माहीतीचा समावेश महाविद्यालयांकडुन करण्यात यावा याबाबतच्या सुचना प्राप्त झालेल्या आहे. करीता सर्व प्राचार्यांनी याबाबत तातडीने महाविद्यालय स्तरावर तसेच पदव्युत्तर शैक्षणिक विभाग प्रमुखांनी विभाग स्तरावर कार्यवाही घ्यावी.

मा. प्र–कुलगुरु यांच्या आदेशान्वये

१९/६/२०२१

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र –संलग्नित उपरोक्तप्रमाणे

Outward No. Minister/WCD/MP/591
Date : 13/05/2021

मंत्री

महाराष्ट्र राज्य

मंत्री
महिला व बालविकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*minister_wcd@gov.in*

प्रधान सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 125 VIP
दि. 14/5/21

दिनांक : 13/05/2021

विषय : महाविद्यालयांमध्ये "कामाच्या ठिकाणी महिलांचे लैगिंक छळापासून अत्याचार अधिनियम, २०१३" जनजागृतीबाबत.

महोदय,

महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु होत असतानाच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेत विद्यार्थ्यांची छेडछाड, लैगिंक छळ रोखण्याकरीता असलेला कायदा, त्याचे स्वरुप, संबंधीत महाविद्यालयात असलेली तक्रार निवारण समिती आदीबाबत माहिती दिल्यास महाविद्यालयात होणाऱ्या अशा घटनांना आळा बसु शकतो व जनजागृती होऊ शकते.

तेव्हा महाविद्यालयांना प्रवेश पुस्तिकेत व संकेतस्थळावर अशी माहिती देणे बंधनकारक करावे, ही विनंती.

(अँड. यशोमती ठाकूर)

प्रति,

प्रधान सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण.
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मंबई.

**महाराष्ट्र शासन**

क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.४८/विशि-५,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१४,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दि. २४ मे, २०२१

प्रति,

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
२) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
३) संचालक, तांत्रिक शिक्षण संचालनालय, मुंबई

विषय : महाविद्यालयांमध्ये "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ" (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा, २०१३ च्या जनजागृतीबाबत.

संदर्भ : मा. मंत्री, महिला व बालविकास यांचे दिनांक १३ मे, २०२१ रोजीचे पत्र.

महोदय,

कामाच्या ठिकाणी महिलांना संरक्षण मिळावे, महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणे यासाठी "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ" (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा, २०१३ हा कायदा करण्यात आला आहे.

या कायद्याची जनजागृती होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु होत असतानाच, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेत "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ" (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा, २०१३ च्या कायद्याचे स्वरुप, महाविद्यालयात असलेली तक्रार निवारण समिती आदीबाबत माहितीचा समावेश करण्याच्या दृष्टीने सर्व महाविद्यालयांना/शैक्षणिक संस्थांना सूचना देण्यात याव्यात.

तसेच याबाबतची माहिती महाविद्यालयांच्या / शैक्षणिक संस्थांच्या संकेतस्थळावर देण्यात यावी. तसेच कार्यवाही पूर्ततेबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

आपला,

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

E:\prasad २०२०\पत्र २०२०.docx